दाखल दिनांक : २३/०४/२०२५
नोंदणी दिनांक : २४/०४/२०२५
निकाल दिनांक : १३/०३/२०२६
कालावधी : ०व. १०म. १८दि

प्रपत्र क्र.३२ भाग “अ” (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(i)

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | अतिरीक्त सत्र न्यायालय, सोलापूर. |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १३/०३/२०२६. |
| खटला क्रमांक | : | सत्र खटला क्र.९६/२०२५. |
| प्रथम खबरी अहवाल माहिती | : | पो.स्टे. अक्कलकोट उत्तर गुन्हा क्र.१२४/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ३२८, १८८, २७२, २७३ आणि अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम 26 (2)(i), 26 (2)(iv), 27 (3)(e), 59 rws 3(1)(zz)(iii). |
| तक्रारदार | : | सरकार मार्फत पो.स्टे. अक्कलकोट उत्तर |
| तक्रारदारचे वकील | : | सरकारी वकील श्रीमती देशपांडे |
| आरोपी | : | मुजीब अब्दुल लतीफ बागवान, वय ३० वर्षे, धंदा मजुरी, रा.पंजाब तालीम, बुधवार पेठ, अक्कलकोट, तालुका अक्कलकोट, जिल्हा सोलापूर. |
| आरोपींचे वकील | : | श्री.स.म.खोबरे |

प्रपत्र क्र.३२ भाग “अ” (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १२/०४/२०२३ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | १२/०४/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २३/०४/२०२५ |
| दोषारोपा निश्चित तारीख | २९/०४/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २६/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | लागू नाही |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | लागू नाही |

## आरोपींची माहीती

| आरोपीं क्रमांक | आरोपीची नाव | अटक तारीख | जाामिनावर सोडल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | शिक्षा झाली किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | खटला चालू असतानाचा जेलमधील कालवधी फौ. व्य.सं.कलम ४२८ खाली आरोपीस देण्यात आलेली सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुजीब अब्दुल लतीफ बागवान, | १२/०४/२०२३ | नमुद नाही | भारतीय दंड संहिताचे कलम ३२८, १८८, २७२, २७३ आणि अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम 26 (2)(i), 26 (2)(iv), 27 (3)(e), 59 rws 3(1) (zz)(iii). | निर्दोष सोडले | लागू नाही | लागू नाही |

## भाग “क” : सिव्हील मॅन्युअल चॅप्टर ६ परिच्छेद ४४ (३)
## सरकार/बचाव/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

अ. सरकार पक्षाचे साक्षीदार :

| अ.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती रेणूका रमेश पाटील | १८ | फिर्यादी |

ब. बचावपक्षाचे साक्षीदार

| अ.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| ——— निरंक —— | | | |

क. न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| ——— निरंक ——— | | | |

सरकारपक्ष/बचावपक्ष/न्यायालयाच्या कागदोपत्री निशाणींची यादी

अ. सरकारपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ——— निरंक ——— | | |

ब. बचावपक्ष

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ——— निरंक ——— | | |

क. न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ——— निरंक ——— | | |

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल संख्या | वर्णन |
|---|---|---|
| ——— निरंक ——— | | |

## न्या य नि र्ण य

(पारित दि.१३/०३/२०२६)

१. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२८,१८८, २७२, २७३ तसेच अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६(२)(i), २६(२)(iv), २७(३)(e), ५९ सह कलम ३(१)(zz)(iii) खाली प्रस्तुतचा खटला दाखल करण्यात आला आहे.

२. दोषारोपपत्रातील प्रकथने थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

फिर्यादी श्रीमती रेणूका पाटील यांनी दिनांक १२/०४/२०२३ रोजी पो.स्टे. अक्कलकोट उत्तर येथे फिर्याद दिली त्यातील मजकुर असा की श्रीमती रेणूका पाटील हया सोलापूर येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयात अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक १२/०४/२०२३ रोजी दुपारी १२.१५ च्या सुमारास त्यांनी विकास हॉटेल ते कांदा बाजार रस्त्यावर अक्कलकोट बस स्थानकाच्या मागील बाजूस असलेल्या बिन—नावाच्या टपरीची पंच साक्षीदार लालसिंग राठोड समक्ष तपासणी केली असता त्या ठिकाणी सुका मावाच्या रु.५००/— किंमतीच्या ५० पाऊच व ओला मावाच्या रु.२०००/— किंमतीच्या २०० पाउच असा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला मावा विक्रीसाठी वाहतुक केलेला आढळून आला. त्या टपरीतून प्रतिबंधीत अन्न पदार्थाची विक्री होवू नये म्हणून त्यांनी ती सिलबंद केली. आरोपी मुजीब हा

त्याठिकाणी हजर होता व तो प्रतिबंधीत साठा त्याचे मालकीचा असल्याचे आरोपीने सांगितले होते. आरोपीने जनहीत व जनआरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधीत असलेला मावा विक्री हेतू साठवून ठेवला व त्याद्वारे अन्न सुरक्षा व मानदे कायद्याच्या शिक्षापात्र कलम ५९ व अन्न सुरक्षा आयुक्त मुंबई यांनी जारी केलेल्या दिनांक १५/०७/२०२२ रोजीच्या अधिसुचनेचे उल्लंघन केले.

३. आरोपीने सदर प्रतिबंधीत साठा कोठून आणला, कोणाला देणार होता व अजून कोठे साठा करुन ठेवला आहे का तसेच त्याच्या व्यवसायातील भागीदार कोण आहे याची माहिती मिळण्याकरीता फिर्याद देत आहे असे नमुद करुन फिर्यादी यांनी वर प्रमाणे फिर्याद दिल्यावरुन पो.स्टे. अक्कलकोट येथे आरोपींविरुध्द भा.दं.वि.च्या कलम ३२८, १८८, २७२ व २७३ तसेच अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम कलम २६(२)(i), २६(२)(iv), २७(३)(e), ५९ सह कलम ३(१)(zz)(iii) खाली गुन्हा नोंदविण्यात आला. फिर्यादी श्रीमती रेणूका पाटील यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी घटनास्थळाला भेट दिली त्यावेळी त्यांनी फिर्यादीत नमुद केल्याप्रमाणे मावा मिळून आल्याबाबत त्याच दिवशी तपासणी अहवाल व मेमोरॅडम पंचनामा तयार केला होता व त्यावर आरोपीच्या सहया घेतल्या. श्रीमती पाटील यांनी दिलेल्या फिर्यादवरुन नोंदल्या गेलेल्या गुन्हयाचा तपास पोलिस उपनिरीक्षक श्री.पुजारी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा तयार केला, आरोपीला अटक केली, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती पुरावा मिळून आल्याने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग अक्कलकोट यांचे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. भा.दं.वि.च्या कलम ३२८ खालील गुन्हा सत्र न्यायालयाने चालवावयाचा असल्याने न्यायदंडाधिकारी अक्कलकोट यांनी प्रकरण या सत्र न्यायालयात वर्ग केले.

४. आरोपीविरुध्द निशाणी क्र.१४ वर दोषारोप निश्चित करण्यात आला. आरोपीस दोषारोप मान्य नसल्याचे निवेदन त्याने केले.

५. खालील मुद्दे मी विचारार्थ घेतले. त्या मुद्यांवर त्याखाली नमुद

कारणासांठी मी माझे निष्कर्ष नमुद केले.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| (१)दि.१२/०४/२०२३ रोजी दुपारी १२.१५ च्या सुमारास आरोपी विकास हॉटेल ते कांदा बाजार रस्त्यावर अक्कलकोट बसस्थानकाच्या मागे आरोपीने बिननावी टपरीमध्ये प्रतिबंधीत अन्न म्हणजे ५० पुडया सुका मावा आणि २०० पुडया ओला मावा साठवून जनआरोग्यास धोका निर्माण केला व त्याद्वारे भा.दं.वि.च्या कलम ३२८ खाली गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले का? | ...नाही. |
| (२)उपरोक्त नमुद दिवशी, तारीख व वेळेला आरोपीने जनआरोग्यास धोका निर्माण करण्याचे उद्देशाने प्रतिबंधीत सुका व ओला मावा विक्रीसाठी साठवला व त्याद्वारे भा.दं. वि.च्या कलम २७२ खाली गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले का? | ...नाही. |
| (३)उपरोक्त नमुद दिवशी, तारीख व वेळेला आरोपीने जनआरोग्यास धोका निर्माण होईल याची जाणीव असूनही प्रतिबंधीत सुका व ओला मावा विक्री केला व त्याद्वारे भा.दं. वि.च्या कलम २७३ खाली गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले का? | ...नाही. |
| (४)उपरोक्त नमुद दिवशी, तारीख व वेळेला आरोपीने सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी जारी केलेल्या आदेशाचा भंग करुन जनआरोग्यास धोका निर्माण होणारा प्रतिबंधीत सुका व ओला मावा साठवून विक्रीसाठी उपलब्ध केला व त्याद्वारे भा.दं.वि.च्या कलम १८८ खाली गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले का? | ...नाही. |
| (५)उपरोक्त नमुद दिवशी, तारीख व वेळेला आरोपीने जनआरोग्यास धोका निर्माण होणारा व मानवी जिवनास असुरक्षित व धोकादायक असणारा प्रतिबंधीत सुका व ओला मावा साठवून विक्रीसाठी उपलब्ध केला व त्याद्वारे आरोपीने अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियमाचे कलम २६(२)(i), २६(२)(iv), २७(३)(e), ५९ सह कलम ३(१)(zz)(iii) खाली गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले का? | ...नाही. |
| (६)आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

६. आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी सरकारपक्षातर्फे वर नमुद केल्याप्रमाणे केवळ फिर्यादी यांना साक्षीदार म्हणून तपासण्यात आले. याशिवाय सरकारपक्षाने वर नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर केली. फौजदारी व्यवहार

संहितेच्या कलम ३१३ खाली आरोपीचा जबाब नोंदविण्यात आला. आरोपीने त्याचेवतीने कोणीही साक्षीदार तपासला नाही. सरकारपक्षातर्फे विद्वान सरकारी वकील श्रीमती देशपांडे यांचा तर आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. खोबरे यांचा युक्तिवाद मी ऐकला.

**<u>कारणे— मुद्दे क्र.(१) ते (६) साठी:</u>**

७. सर्व मुद्दे चर्चेसाठी सोबत घेण्यात आले. सा.क्र.१ रेणूका पाटील यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की गोपनीय माहीती मिळाल्यावरुन त्या कार्यालयीन सहकारी श्रीमती नंदीनी हिरेमठ, पंच लालसिंग राठोड व कार्यालयीन वाहनाचे वाहक रहाटे यांचेसह दि.१२/०४/२०२३ रोजी अक्कलकोट बसस्थानकाच्या मागील बाजूस असलेल्या एका पान टपरीवर गेल्या, आरोपी तेथे हजर होता व त्या टपरीमध्ये त्यांना सुका मावाच्या ५० पुडया व ओला मावाच्या २०० पुडया असा एकुण रु.२५००/— किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. त्यांनी पुराव्यात पुढे सांगितले की त्यांनी तपासणी अहवाल नि.क्र.१९ व मेमोरेंडम पंचनामा नि.क्र.२० तयार केले व त्याद्वारे सुका मावा तसेच ओला मावा यामधून वेगवेगळे नमुने काढून घेवून उर्वरीत मुद्देमाल जप्त केला. त्यांनी पुराव्यात पुढे सांगितले की त्यांनी तपासणी अहवाल व मेमोरेंडमवर आरोपीच्या सहया घेतल्या. त्यांनी पुराव्यात सांगितले की तो मुद्देमाल त्याचा असल्याचे आरोपीने सांगितले व त्यांनी पो.स्टे. अक्कलकोट येथे जावून आरोपीविरुध्द फिर्याद नि.क्र.२१ दिली. त्यांनी पुराव्यात सांगितले की घेतलेले नमुने त्यांनी पत्र नि.क्र.२२ सोबत तपासणीकामी अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा औरंगाबाद येथे पाठविले, त्या प्रयोगशाळेकडून त्यांना अहवाल नि.क्र.२३ प्राप्त झाला व त्या अहवालानुसार नमुन्यांमध्ये मानवी जिवीतास धोकादायक व जीवघेणी असलेली रासायनिक तत्वे कॅल्शियम कार्बोनेट व निकोटीन मिळून आले. त्यांनी पुराव्यात पुढे सांगितले की उर्वरीत जप्त साठा नष्ट करण्यासाठी परवानगी मागणारा अर्ज नि.क्र.२४ त्यांनी सहा.आयुक्त अन्न व प्रशासन यांचेकडे दि.२०/०३/२०२४ रोजी सादर केला जो नि.क्र.२५ वरील आदेशानुसार मंजूर झाल्याने त्यांनी पंचनामा नि.क्र.२६ तयार

करुन उर्वरीत मुद्‌देमाल नष्ट केला. त्यांनी पुराव्यात पुढे असेही सांगितले की आरोपीविरुध्द खटला दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी त्यांनी सहा.आयुक्त यांच्याकडे त्या पत्रासह नि.क्र.२७ संयुक्तपणे असा अहवाल सादर केला जो त्या कार्यालयाने पुणे येथील वरिष्ठ कार्यालयाकडे पत्र नि.क्र.२८ द्वारे पाठवला व पुणे येथील कार्यालयाने आदेश नि.क्र.२९ अन्वये प्रस्ताव मंजूर केला. त्यांनी पुराव्यात पुढे सांगितले की प्राप्त झालेली कागदपत्रे ज्यामध्ये त्यांच्या स्वत:च्या कार्यक्षेत्र वाटपाचा आदेश, ओळखपत्रे, शासकीय वाहनाच्या लॉगबुकमधील संबंधीत दिवसाच्या नोंदीचा उतारा नि.क्र.३० हे पोलिसांच्या स्वाधीन केले होते.

८. साक्षीदार क्र.१ श्रीमती रेणूका पाटील यांनी उलटतपासणीत मान्य केले की घेतलेले नमुने चाचणीसाठी पाठविण्यात आले तोपर्यंत त्यांच्या स्वत:च्या ताब्यात होते व दि.१३/०४/२०२३ पासून ते १८/०४/२०२३ पर्यंत ते नमुने कोठे होते त्याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. ते नमुने पोष्टाने पाठविण्यात आले होते असे जरी त्यांनी सांगितले तरी ते दाखविण्यासाठी त्यांच्याकडे कागदोपत्री पुरावा नसल्याचे त्यांनी मान्य केले. औरंगाबाद येथील अन्न व औषध प्रयोगशाळेस ते नमुने प्राप्त झाले तोपर्यंत ते नमुने सुरक्षित राखून ठेवण्यात आले होते व त्यामध्ये फेरफार करण्यात आला नव्हता हे दाखविण्यासाठी सरकार पक्षातर्फे योग्य तो पुरावा सादर करण्यात आलेला नाही व सरकारपक्षाने तपासलेल्या एकमेव साक्षीदार श्रीमती रेणुका पाटील यांचा पुरावा ते दाखविण्यासाठी पुरेसा नाही.

९. सा.क्र.१ श्रीमती पाटील यांनी उलटतपासणीत मान्य केले की अन्न सुरक्षा अधिनियमातील तरतुदींनुसार घेतलेले नमुने चार भागात विभागून त्यापैकी एक भाग चाचणीसाठी पाठविण्याची व इतर तीन भाग कार्यालयात सुरक्षित ठेवण्याची प्रक्रीया त्यांनी प्रस्तुतच्या कारवाईबाबत राबवली नव्हती. कायद्याने तशी प्रक्रीया राबविणे गरजेचे असूनही श्रीमती पाटील यांनी त्याची पुर्तता केली नाही ही बाब त्यांच्या उलटतपासणीवरुन स्पष्ट आहे व त्यामुळे कायदेशीर तरतुदीच्या त्या अटीचे पालन न होणे या बाबीचा फायदा आरोपीचे

हक्कात देणे गरजेचे आहे.

१०. उपलब्ध पुराव्यांवरुन असे दिसून येते की ज्या टपरीवर धाड घालण्यात आली त्या टपरीवर नाव नव्हते. श्रीमती पाटील यांनी त्यांच्या उलटतपासणीत मान्य केले की ती टपरी आरोपीच्या मालकीची किंवा ताब्यातील होती हे दाखविणारा कुठलाही कागदोपत्री पुरावा त्यांनी हस्तगत केला नव्हता. श्रीमती पाटील यांनी दि.१२/०४/२०२३ रोजी तयार केलेल्या तपासणी अहवाल व मेमोरॅन्डमवर त्याच्या सहया असल्याचे जरी आरोपीने नाकारले नसले तरी आरोपीने त्या सहया घटनास्थळावर केल्या होत्या हे दाखविणारा जोडपुरावा प्रकरणात उपलब्ध नाही. याशिवाय तो तथाकथित मुद्देमाल कोणाकडून खरेदी केला व तो कोणास विकणार होता याबाबत पुरावा त्यांनी हस्तगत केला नसल्याचे श्रीमती पाटील यांनी उलटतपासणीत मान्य केले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी उलटतपासणीत हे देखील मान्य केले की आरोपी हा त्यादिवशी कोणतेही प्रतिबंधीत अन्न वाहतूक करत नव्हता व त्याबाबत त्यांची फिर्याद, मेमोरॅन्डम व तपासणी अहवाल यामध्ये आलेला उल्लेख चुकीचा आहे. आरोपी हा कुठल्याही प्रतिबंधीत अन्नाची वाहतूक करत नव्हता तरीही तसा उल्लेख करुन मेमोरॅडम व तपासणी अहवाल तयार करणे व तशा उल्लेखाची पोलिसात आरोपीविरुध्द फिर्याद देणे या बाबी सा.क्र.१ श्रीमती पाटील यांनी केलेल्या एकंदरीतच कारवाईबाबत व पुराव्याबाबत शंका उत्पन्न करण्यास पुरेशा आहेत. त्या बाबतीत झालेली चुक ही टंकलेखनाची चुक असल्याचे जरी श्रीमती पाटील यांनी सांगितले असले तरी त्यांनी दिलेले ते स्पष्टीकरण दोषारोपपत्र दाखल करण्याआधी दिलेले नसल्याने स्विकारार्ह दिसून येत नाही.

११. आरोपीने प्रतिबंधीत माल स्वत:च्या ताब्यात ठेवला हे दाखविण्यासाठी श्रीमती पाटील यांचा एकमेव पुरावा पुरेसा नाही. श्रीमती पाटील यांनी आरोपी विरुध्द पोलिसात दि.१२/०४/२०२३ रोजी फिर्याद दिली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते की प्रयोगशाळेकडून नि.क्र.२३ प्रमाणे जो अहवाल प्राप्त झाला त्यानुसार नमुन्यांमध्ये मानवी जिवीतास धोकादायक व जीवघेणी

असलेली रासायनिक तत्वे कॅल्शियम कार्बोनेट व निकोटीन मिळून आले. श्रीमती पाटील यांच्या पुराव्यावरून ही बाब स्पष्ट आहे की आरोपीविरुध्द कारवाई करण्यासाठी सह—आयुक्त अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दि.१०/०४/२०२४ रोजी मंजूरी दिली. तपास अधिकारी यांनी आरोपीविरुध्द ती मंजूरी मिळण्याआधीच दिनांक ९/८/२०२३ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियमाचे कलम ४२ चे त्या संदर्भात पालन झालेले नाही ही बाब स्पष्ट आहे. शिवाय आरोपी हा कुणासही मावा विक्री करतांना मिळून आला होता असे उपलब्ध पुराव्यांवरून दिसून येत नाही. ज्या टपरीमधून प्रतिबंधीत मावा जप्त करण्यात आला ती टपरी आरोपीच्या मालकीची किंवा ताब्यातील होती हे दाखविणारा सयुक्तिक पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. उपरोक्त बाबींचा सारासार विचार करता सरकारपक्ष हा आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला असे म्हणत त्यानुसार मुद्दे क्र.(१) ते (६) वर नकारार्थी निष्कर्ष नमुद करत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

१. आरोपी मुजीब अब्दुल लतीफ बागवान याची फौ.व्य.सं.च्या कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२८, १८८, २७२, २७३ आणि अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६(२)(i), २६(२)(iv), २७(३)(e), ५९ सह कलम ३(१)(zz)(iii) खालील गुन्हयांमधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे स्वबंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौ.व्य.सं.च्या कलम ४३७—अ च्या तरतुदींन्वये रुपये २५,०००/— चे स्वबंधपत्र व जामीनपत्र सादर करावेत.

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Date: 2026.03.17 11:33:35 +0530

दिनांक: १३/०३/२०२६.

**(प्रशांत प्रभाकर राजवैद्य)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश,**
**सोलापूर.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kurle S.S., Steno Grade-1 |
| (b) | Court | : | Addl. Sessions Judge, Solapur. |
| (c) | Order dictated by P.O. on | : | 13/03/2026. |
| (d) | Order signed by P.O. | : | 13/03/2026. |
| (e) | Digital Signature on | : | 17/03/2026 |
| (e) | Order uploaded on | : | 17/03/2026. |